**शपथेवर उलटतपास सुरू**

**उलटतपास — विधिज्ञ श्री. आर.एन. पाटील, जाबदार क्रमांक १ तर्फे**

६. हे म्हणणे खरे आहे की, कवठेमहांकाळ ग्रामपंचायतमध्ये मला थेट नेमणूक देण्यात आलेली होती, कुठलीही जाहिरात निघालेली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, ग्रामपंचायतीने ठराव करून मला नेमणूक दिलेली होती. असा कुठला ठराव ग्रामपंचायतीने पंचायत समिती किंवा जिल्हापरिषदेकडे पाठविला नव्हता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला ग्रामपंचायतीने तात्पूरत्या स्वरूपात कामावर घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की ग्रामपंचायतीने मला कुठलेही नेमणूकपत्र दिलेले नव्हते. माझ्या म्हणण्याप्रमाणे माझी सेवानिवृत्तीची तारीख ३१.५.२०१९ अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, कवठेमहांकाळ ग्रामपंचायतीचे २०१६ साली नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाले. हे म्हणणे खरे आहे की, मी नगरपंचायतमध्ये तीन वर्षे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सेवानिवृत्त होण्यापूर्वी मी माझी १९८९ पासून २०१९ पर्यंतची सेवा अखंडीतपणे धरण्यात यावी अशी मागणी जाबदार क्रमांक २ यांच्याकडे केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, जाबदार क्रमांक १ ने जाबदार क्रमांक २ कडे माझ्या मागणी संदर्भात खुलासा मागितला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर खुलासा येण्यापूर्वीच मी घाईगडबडीने प्रस्तूत तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नगरपंचायतीकडे केवळ तीन वर्षे नोकरी केल्यामुळे मला नगरपंचायतीच्या नियमांप्रमाणे निवृत्तीवेतन, उपदान, रजा रोखीकरण हे फायदे मिळू शकत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कुठलेही कारण नसतांना मी जाबदार क्रमांक १ चे विरूध्द प्रती खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेली कागदपत्रे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहेत.

जाबदार क्रमांक १ तर्फे उलटतपास पूर्ण.

जाबदार क्रमांक २ तर्फे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही

सांगली (रा. व. उत्पात)
सदस्य
दिनांक : ०२.०८.२०२५ औद्योगिक न्यायालय, सांगली